# नियमित दिवाणी दावा क्र. २२३/१९७५ मध्ये निशाणी क्र. ३०६ कडील अर्जावर आदेश

१) वादी क्र. १अ, वादी क्र. ७, वादी क्र. ८, वादी क्र. १५ ते १७, प्रतिवादी क्र. २फ, प्रतिवादी क्र. १३, प्रतिवादी क्र. १६ यांचे नाव दाव्यातून कमी करण्यास परवानगी मिळण्याकरीता वादींतर्फे प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२) वादींनी प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, वादी क्र. १अ कलावती निवृत्ती वाघमारे ह्या दिनांक १९/०६/२०१६ रोजी मयत झाल्या आहेत. सदर वादी क्र. १अ चे वारस या कामी वादी क्र. १ब ते १ग म्हणून सामील आहेत. वादी क्र. ७ अशोक वाघमारे हे दिनांक १५/०७/१९८५ रोजी मयत झाले असून त्यांचे वारस या कामी सामील आहेत. तसेच वादी क्र. १५ शामू वाघमारे हे दिनांक १०/११/२००३ रोजी मयत झाले आहेत. तसेच वादी क्र. १६ भिमा राऊ वाघमारे हे दिनांक २५/१०/२००९ रोजी मयत झाले आहेत. तसेच वादी क्र. १७ तातोबा तायाप्पा वाघमारे हे दिनांक ०६/०५/१९९५ रोजी मयत झाले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. २फ गणपती कुंभार हे दहा वर्षांपुर्वी मयत झाले आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १३ सोनाबाई गायगवाले ह्या दिनांक २०/१०/२०१४ रोजी मयत झाल्या आहेत. तसेच प्रतिवादी क्र. १६ चंदर वाघमारे हे दिनांक २७/०७/२०१३ रोजी मयत झाले आहेत. वादींनी या अर्जात पुढे असे कथन केले आहे की, वादी क्र. १५, १६, १७ व प्रतिवादी क्र. १३, १६ हे या दाव्याच्या कामी आवश्यक पक्षकार नाहीत. प्रस्तुत अर्जात अशी विनंती केली आहे की, वादी क्र. १अ, वादी क्र. ७, वादी क्र. ८, वादी क्र. १५ ते १७, प्रतिवादी क्र. २फ, प्रतिवादी क्र. १३, प्रतिवादी क्र. १६ यांची नावे दाव्यातून कमी करण्यास परवानगी द्यावी.

३) या अर्जास म्हणणे देण्याबाबत प्रतिपक्षास आदेशित केले आहे. प्रतिवादी

क्र. २क ते २ई तर्फे प्रस्तुत अर्जास निशाणी क्र. ३१० कडे म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी क्र. २क ते २ई तर्फे प्रस्तुत अर्जास दिलेल्या निशाणी क्र. ३१० कडील म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, वादींनी याच आशयाचा अर्ज निशाणी क्र. २५३ कडे दिला होता. तो अर्ज न्यायालयाने दिनांक ०९/०१/२०१९ रोजी फेटाळला आहे. सदर प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्यामध्ये पुढे असे कथन केले आहे की, दाव्यातील संबंधित पक्षकारांच्याबाबत अबेटमेंटच्या कारणाने दावा रद्द झाल्यानंतर वादींना प्रस्तुत स्वरुपाची त्यांची नावे कमी करण्याची दुरुस्ती मागता येत नाही. वादींनी वारसांची पुर्तता मुदतीत न केल्यामुळे आपोआप अबेटमेंट होत असल्यामुळे त्या पक्षकाराचे नाव कमी करण्याची मागणी करता येणार नाही. सदर प्रतिवादींनी वादींचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४) प्रतिवादी क्र. २क ते २ई व्यतिरिक्त इतर प्रतिवादींनी या अर्जावर त्यांचे म्हणणे दिले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. २क ते २ई व्यतिरिक्त इतर प्रतिवादींच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात येतो.

५) प्रस्तुत अर्जाच्या कामी वादींच्या व प्रतिवादी क्र. २क ते २ई यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. २क ते २ई व्यतिरिक्त इतर प्रतिवादींच्या विद्वान वकीलांना या अर्जाच्या युक्तीवादाकामी दुपारी १.२४ वाजेपर्यंत वारंवार पुकारले असता गैरहजर असल्याने या अर्जावर प्रतिवादी क्र. २क ते २ई व्यतिरिक्त इतर प्रतिवादींतर्फे युक्तिवाद नाही असा आदेश पारीत केला आहे. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

६) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी क्र. १ड च्या वारसांनी यापुर्वी वादी क्र. २ ते १७ व प्रतिवादी क्र. ३ ते १९ यांची नावे दाव्यातून कमी करण्यास परवानगी मिळण्याकरीता निशाणी क्र. २५३ कडे दाखल केलेला अर्ज न्यायालयाने

दिनांक ०९/०१/२०१९ रोजी नामंजूर केला आहे. वादींनी निशाणी क्र. ३०९ कडील यादीसोबत वादी क्र. १अ, वादी क्र. ७, वादी क्र. ८, वादी क्र. १५ ते १७, प्रतिवादी क्र. १३, प्रतिवादी क्र. १६ यांची मृत्यु प्रमाणपत्रे दाखल केली आहेत. सदर मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी क्र. १अ कलावती निवृत्ती वाघमारे ह्या दिनांक १९/०६/२०१६ रोजी मयत झाल्या आहेत व वादी क्र. ७ अशोक वाघमारे हे दिनांक १५/०७/१९८५ रोजी मयत झाले आहेत व वादी क्र. ८ वसंत वाघमारे हे दिनांक १४/१२/१९९४ रोजी मयत झाले आहेत व वादी क्र. १५ शामू वाघमारे हे दिनांक १०/११/२००३ रोजी मयत झाले आहेत व वादी क्र. १६ भिमा राऊ वाघमारे हे दिनांक २५/१०/२००९ रोजी मयत झाले आहेत व तसेच वादी क्र. १७ तातोबा तायाप्पा वाघमारे हे दिनांक ०६/०५/१९९५ रोजी मयत झाले आहेत व प्रतिवादी क्र. १३ सोनाबाई गायगवाले ह्या दिनांक २०/१०/२०१४ रोजी मयत झाल्या आहेत व प्रतिवादी क्र. १६ चंदर वाघमारे हे दिनांक २७/०७/२०१३ रोजी मयत झाले आहेत. सदरची मृत्यु प्रमाणपत्रे काही वर्षांपुर्वी इश्यु केल्याचे दिसून येते. वादींनी प्रतिवादी क्र. २फ गणपती खाशाबा कुंभार यांचे मृत्यु प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केल्याचे दिसून येत नाही.

७) रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी क्र. १अ, वादी क्र. ७, वादी क्र. ८, वादी क्र. १५ ते १७, प्रतिवादी क्र. १३, प्रतिवादी क्र. १६ हे मयत झाल्यानंतर वादींनी त्यांचे वारस अभिलेखावर घेण्याबाबत विहित मुदतीमध्ये कोणताही अर्ज दाखल केलेला नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता क्र. २२, नियम ३, उपनियम २ मधील तरतुदीनुसार प्रस्तुतचा दावा वादी क्र. १अ, वादी क्र. ७, वादी क्र. ८, वादी क्र. १५ ते १७, प्रतिवादी क्र. १३, प्रतिवादी क्र. १६ यांच्याविरुद्ध आपोआप अबेट झाला आहे. प्रस्तुतचा दावा वादी क्र. १अ, वादी क्र. ७, वादी क्र. ८,

वादी क्र. १५ ते १७, प्रतिवादी क्र. १३, प्रतिवादी क्र. १६ यांच्याविरुद्ध आपोआप अबेट झाला असल्याने माझ्या मते सदर वादी व प्रतिवादींची नावे दाव्यातून कमी करण्यास परवानगी देण्याचा प्रश्न उपस्थीत होत नाही. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे वादींनी प्रतिवादी क्र. २फ गणपती खाशाबा कुंभार यांचे मृत्यु प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते वादी क्र. १अ, वादी क्र. ७, वादी क्र. ८, वादी क्र. १५ ते १७, प्रतिवादी क्र. १३, प्रतिवादी क्र. १६ व प्रतिवादी क्र. २फ यांची नावे दाव्यातून कमी करण्यास परवानगी वादींची मिळण्याची प्रस्तुत अर्जातील विनंती समर्थनीय नाही व ती नामंजूर होण्यास पात्र आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता क्र. २२, नियम ३, उपनियम २ मधील तरतुदीनुसार प्रस्तुतचा दावा वादी क्र. १अ, वादी क्र. ७, वादी क्र. ८, वादी क्र. १५ ते १७, प्रतिवादी क्र. १३, प्रतिवादी क्र. १६ यांच्याविरुद्ध आपोआप अबेट झाला असल्याने त्यांच्याविरुद्ध निशाणी क्र. १ वर अबेटमेंटचा आदेश पारीत करणे आवश्यक आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१) वादी क्र. १अ, वादी क्र. ७, वादी क्र. ८, वादी क्र. १५ ते १७, प्रतिवादी क्र. १३, प्रतिवादी क्र. १६ व प्रतिवादी क्र. २फ यांची नावे दाव्यातून कमी करण्यास परवानगी वादींची मिळण्याची प्रस्तुत अर्जातील विनंती नामंजूर करण्यात येते.

२) दिवाणी प्रक्रिया संहिता क्र. २२, नियम ३, उपनियम २ मधील तरतुदीनुसार प्रस्तुतचा दावा वादी क्र. १अ, वादी क्र. ७, वादी क्र. ८, वादी क्र. १५ ते १७, प्रतिवादी क्र. १३, प्रतिवादी क्र. १६ यांच्याविरुद्ध आपोआप अबेट झाला

असल्याने त्यांच्याविरुद्ध निशाणी क्र. १ वर अबेटमेंटचा आदेश पारीत करण्यात येतो.

३) वादींनी प्रतिवादी क्र. २फ गणपती खाशाबा कुंभार यांचे मृत्यु प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल करावे.

४) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.11.25 17:55:31 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांकः– २५/११/२०२५ २ रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.